# आमचे टीकाकार

आमच्या मासिकांत कांही वैशिष्ट्य आहे आणि ग्रंथपरीक्षणांतही तें असतें, असें आम्हीं म्हटलेलें धनुर्धारीला खपलें नाहीं, आणि त्यांनी आमच्यावर एक वाग्बाण सोडला आहे. ते त्याला ' कटाक्ष ' म्हणतात. पण हे वेडेवांकडे कटाक्ष जिकडे तिकडे फेकतांना त्यांची दृष्टि कोठेच स्थिर होत नाही, यामुळे त्यांना सरळ वाक्यांचा देखील अर्थ कळत नाहीसा झाला आहे. निदान आमच्या मतें तरी आमच्यांत कांहीच वैशिष्ट्य नसतें, तर आम्ही मासिक काढलेंच नसतें. कदाचित् आमचा हा घमेंडखोरपणा असेल व असें वाटलें तर लोकांनी म्हणावें. परंतु ग्रंथपरीक्षणांत वैशिष्ट्य असतें असें म्हटल्याने ' गृहकर्म ' या सदरांत दिलेल्या रीतीनें पदार्थ करून खाल्ले असतां ते लैंगिक जीवनाला उपकारक ठरतात, असा अर्थ कसा निघतो हें एक धनुर्धारीलाच माहीत ! त्यांनी आम्हाला केलेली सूचना तर याहूनही और आहे. ते म्हणतात, आपलें ध्येय जर व्यापक आहे, तर मासिकांत बाजारभाव, थोर लोकांच्या हालचाली, घोडे कोणते 'विन' येतील, वगैरे विषय कां देत नाही ? एकतर कोणतीं सदरें यावीं हा आमचा प्रश्न आहे, आणि कोणते घोडे 'विन' येतील वगैरे सदरें देऊन वाचकांची फसवणूक धनुर्धारीसारखे लोक करतातच आहेत, तेव्हा आम्हीही तशीच करूं लागलों तरमग आमचें वैशिष्ट्य काय राहिलें ? इतकेंही तारतम्य न दाखवणारे हे तिरवे कटाक्ष कोणाला घायाळ करतील ते करोत, आमच्यावर त्यांचा परिणाम होणार नाही.

आमच्या **आधुनिक आहारशास्त्रा**वर अभिप्राय देतांना कांही परीक्षकांनी जो हेकेखोरपणा दाखवला आहे, त्याचाही येथें उल्लेख करणें जरूर आहे. ' महाराष्ट्र–परिचय ' मधील परीक्षणांत या पुस्तकांतील धर्मसंबंधी भाग काढून टाकावा अशी सूचना आहे. आहारांत ज्याचा संबंध येतो अशा धार्मिक समजुतींवर टीका आहारशास्त्रावरील पुस्तकांत आलीच पाहिजे असें

आमचें मत आहे. ज्यांना आरोग्याची काळजी आहे त्यांनी वेडगळ धार्मिक समजुतींना भीक घालतां नये. ध्रुव मधील टीकाकारांनी याहूनही कमाल केली आहे. ते स्वत:स तज्ञ समजत असतील व त्यांच्या मताविरुद्ध आम्हीं कांही लिहिलें असेल हें शक्य आहे, व तसें असल्यास तें खोडून काढण्याचा त्यांना हक्क आहे. परंतु तें खोडून न काढतांच अद्वातद्वा विधानें करणें त्यांना शोभत नाही. उदाहरणार्थ मद्यासंबंधी आम्ही जें लिहिलें आहे, तें विद्वान डाक्तरांच्या आधारावरच लिहिलें आहे आणि तो आधार आम्ही दिलेला आहे. तें या महाशयांना पसंत न पडून, ' तसेंच दारूच्या उपयुक्ततेची तारीफ व तरफदारी करणारे व दारूबंदी करणाऱ्या कांग्रेस सरकारला अक्कल नाही असें म्हणणारे लेखक महाशय त्यावेळीं कोणत्या अंमलाखालीं होते अशी एकाद्याला शंका आल्याचांचून रहात नाहीं ' असें लिहिणें म्हणजे युक्तिवाद करतां न आल्यामुळे शिव्या देणें आहे. पुढे हे विद्वान आम्हाला सांगतात: ' सगळेंच फ्रेंच ज्ञान अधिकृत नसतें व शास्त्रीयही नसतें. ' व इतर कांही पुस्तकें वाचण्याची आम्हास शिफारस करतात. पहिल्या विधानाबद्दल आम्हास इतकेंच सांगावेंसें वाटतें की त्यांनी प्रथम मराठी भाषा वापरण्यास शिकावें, कारण त्याचा कांही अर्थच होत नाही. जें सत्य असेल त्यालाच ज्ञान म्हणतात, आणि तें सर्व शास्त्रीयच असतें. तेव्हा फ्रेंच ज्ञान अधिकृत नसतें व शास्त्रीय नसतें म्हणजे काय ? इंग्रजी ज्ञान शास्त्रीय असतें अशी त्यांची कल्पना दिसते ! या महाशयांना बहुधा फ्रेंच येत नसावें, एरवी त्यांनीं फ्रेंच शास्त्रीय ज्ञानाची अवहेलना केली नसती. परंतु ज्यांना फ्रेंच येत असेल त्यांनीही फक्त इंग्रजी पुस्तकेंच वाचावीं, किंवा या महाशयांनीं जीं वाचलीं असतील तींच इतरांनी वाचलीं पाहिजेत, असेंही म्हणणें समजंस नाही. आम्ही ज्या पुस्तकांचीं नांवे दिलीं आहेत त्यांतील बरींच इंग्रजीही आहेत, आणि कांही अगदीं नुकतीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. या विषयांत रोज नवीन शोध लागत आहेत, इतकेंच नव्हे तर शास्त्रीय ज्ञानाचे बाबतींत इंग्लंड फारसें पुढारलेलें नाहीं, हें केवळ इंग्रजी जाणणारांना कळावें कसें ? त्यांची पुंजीच तितकी ! पण फ्रेंच किंवा जर्मन येणारांना हें माहीत असतें, आणि त्यांना इंग्रजी पुस्तकांची

शिफारस ऐकून हंसूंच येईल. तथापि मद्याचे बाबतींत आम्ही प्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ क्यू यांचें मत दिलेलें आहे, आणि त्यांनी मद्याचा सर्वस्वी निषेध केलेला नाही. शिवाय इंग्रजीच आधार पाहिजे असतील तर त्यांनीं ए. बार्बारा कॅलो, एम्. ए., एम्. एस् सी., एम्. एस्., यांचें 'फूड् अँड हेल्थ' हें नुकतें प्रसिद्ध झालेलें पुस्तक वाचावें. त्यांतही माफक प्रमाणांत मद्याची उपयुक्तता सांगितलेली आहे. स्वतःचेंच मत ज्यांत सांगितलेलें असेल तोच ग्रंथ आधारभूत समजण्याची गांधी पद्धत आम्हास नको आहे. मद्याबद्दल डाक्तरांत मतभेद आहे हें उघड आहे, व म्हणूनच आम्ही फ्रान्समधील एका डाक्तरांच्या परिषदेचें मत दिलें आहे. तें फ्रेंच असल्यामुळेच टाकाऊ म्हणायचें असल्यास गोष्ट वेगळी.

सनातनी कंपू आमच्या विरुद्ध असल्यास मोठेंसें नवल नाहीं, परंतु असे कंपू जेव्हां आपणास पुढारलेले म्हणवूं पाहातात, तेव्हा मात्र आश्चर्य वाटतें. मुंबईतील अशा प्रकारचा एक कंपू लेखनस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य वगैरेच्या गप्पा मारीत असतो. या कंपूचें नांव सध्यां आम्हास सांगतां येत नाही, तें पुढमाग सांगूं. तथापि त्याची कांहीं मनोरंजक हकीकत येथे सांगण्यास हरकत नाहीं. आम्ही त्यांच्या गप्पांवर विश्वास ठेवून या कंपूचे सभासद झाल्यावर सुमारें एक वर्षानें आमच्या लिखाणावर व विशेषत: या मासिकावर आक्षेप घेणारे कांहीं लोक त्यांत निघाले आणि त्यांनी आम्हास त्यांतून घालवून देण्याचा घाट घातला व आम्हास कमिटीपुढे जाब देण्याकरतां निमंत्रण आलें. आम्ही तेथे गेल्यावर आमचेवर नाना प्रकारचे आरोप व प्रश्नांचा भडिमार करण्यांत आला. तुमचें लिखाण अश्लील असतें, मासिकांतील चित्रें अश्लील असतात, तुम्ही संततिनियमनाचीं साधनें विकतां, ही व्यापारी वृत्ति बरी नव्हे, निदान तुमचा आमच्याशीं कोणताही संबंध असणें बरें नाही असें आमच्यापैकी पुष्कळांचें मत आहे, तेव्हा तुम्ही आपण होऊनच सभासदत्वाचा राजीनामा द्या, नपेक्षा आम्हाला आमच्या अधिकारांत तुमचें नांव काढून टाकावें लागेल, इ. इ. अर्थातच आम्हींही त्यांना उत्तर दिलें की लेखनस्वातंत्र्याच्या वल्गना करणाऱ्या लोकांना आमच्या लिखाणावर अशा

प्रकारचे आक्षेप घेण्याचा हक्क पोंचत नाही, आमचे मासिकांतील चित्रें जगप्रसिद्ध चित्रप्रदर्शनांत दाखवलेलीं नांवाजलेलीं चित्रें असतात, त्यांना अश्लील म्हणणें ही शिवी आहे, संततिनियमनाचीं साधनें विकणें हा व्यापार आहे, पण पुस्तकें लिहिणें आणि विकणें हाही व्यापारच आहे, व व्यापारांत कांही कमीपणा आहे असें आम्हास वाटत नाही. ते पुनः म्हणाले, स्वातंत्र्याला कांही मर्यादा असते, तुम्हाला कोर्टानें शिक्षा केलेली आहे. तेव्हा आम्ही त्यांना आठवण दिली कीं आपल्या सभासदांपैकी कित्येक कॉंग्रेसवाले तुरुंगांत जाऊन आलेले आहेत आणि आम्ही अजून तुरुंगांत तरी गेलों नाही. त्यांचा गुन्हा राजकीय असला तरी गुन्हाच आहे. आणि अश्लीलता हाही मानीवच गुन्हा आहे. आणखी बराच वाद झाल्यावर आम्ही त्यांना स्पष्ट सांगितलें की मी हक्कांकरतां भांडणारा मनुष्य आहे, मी राजीनामा देणार नाही, आपण वाटल्यास खुशाल आपल्या अधिकारांत माझें नांव काढून टाका. त्यांतील एका गृहस्थांनीं विचारलें की विवाहबाह्य आणि विवाहपूर्व समागमाला आपलें मत अनुकूल आहे हें खरें की नाही ? तेव्हा आम्ही सांगितलें की लेखनस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारांना आमची अशा प्रकारें उलटतपासणी करण्याचा बिलकुल हक्क नाही. हा प्रश्न विचारणारे गृहस्थ मुसलमान होते, आणि त्यांचे धर्मांत प्रत्येक पुरुषाला चार लग्नाच्या बायका आणि पाहिजे तितक्या रखेल्या ठेवण्याचा हक्क असतो, आणि तसेंच हिंदु धर्मांत पाहिजे तितक्या बायका व पाहिजे तितक्या रखेल्या ठेवतां येतात. तेव्हा निदान सनातनी हिंदूंनी किंवा मुसलमानांनी तरी विवाहबाह्य समागमाला हरकत करणें हास्यास्पद आहे, कारण रखेली विवाहबाह्य किंवा विवाहपूर्वही असूं शकते. सनातनी लोकांचा वास्तविक कटाक्ष विवाहबाह्य किंवा विवाहपूर्व समागमावर नसतोच, पण हा हक्क फक्त पुरुषांपुरता मर्यादित असावा, स्त्रियांना असा हक्क असूं नये, इतकेंच ते म्हणतात. पण मौज अशी की या कमिटींत एक स्त्रीही होती. या प्रकरणाबद्दल अधिक माहिती पुढें देऊंच, सध्यां इतकेंच पुरें.

---

# एका खटल्याची हकीकत

( फ्रेंचवरून )

रात्री दहा वाजण्याचा सुमार. अंधार काळाकुट्ट पडला होता. आकाशांत तारे देखील फारच थोडे दिसत होते. अशा वेळीं एका खेड्यांतील पानगृहांत तीनचार गिऱ्हाइकें खेळत आणि पीत बसलीं होतीं. दुकान दहा वाजतां बंद केलें पाहिजे असा कायदा, आणि घड्याळांत दहाला पांचच मिनिटें असल्यामुळें दुकानाचा मालक या लोकांना बाहेर कसें काढावें या विचारांत होता. यांत नवीन कांहीच नव्हतें, नेहमींपैकीच प्रकार होता. तो त्यांना निकराच्या आवाजांत म्हणाला " साहेब, आतां दहा वाजले. मी दुकान बंद करतों आहें. "

**एक पिणारा**—वा ! वा ! माझ्या घड्याळांत दहा मिनिटें कमी आहेत. मला डाव पुरा करूं द्या.

--बिलकूल नाहीं. दहा वाजले आहेत, आणि मला पोलीसच्या भानगडा नको आहेत. चला व्हा बाहेर.

**पिणारा**--आम्ही निघत नाही.

दुकानदार घोटाळ्यांत पडला. आपण फार करारी आहों अशी त्या कोपऱ्यावरच्या पोलीसच्या शिपायाला घमेंड होती, तेव्हा जरा उशीर झाला की आपल्याला कोर्टांत जावें लागणार. तेव्हा तो गिऱ्हाइकांना नम्रपणें सांगूं लागला की मेहरबानी करून बाहेर जा. पण ते काय ऐकतात ? ते म्हणाले " अजून दहा वाजले नाहींत, आम्ही निघत नाही. "

इतक्यांत कोणीतरी दार उघडलें. आणखी गिऱ्हाईक ? छे ! पोलीसचा शिपाईच. तो सभ्यपणाने पुढे येऊन म्हणाला "दहा वाजले, तुमचें दुकान अजून उघडें आहे, मला रपोट केला पाहिजे. "

—पण गिऱ्हाइक बाहेर निघत नाही त्याला मी काय करूं ? त्यांना धक्के मारून तर बाहेर काढतां येत नाही ?

**शिपाई**—तो माझा प्रश्न नाही. तुम्ही वाटेल तें करा.

**पिणारा**—अहो शिपाईबुवा, याचा काय अर्थ आहे ? हा अन्याय आहे. अजून दहा वाजलेले नाहीत.

—हें मला नका शिकवूं. हें माझें घड्याळ पहा.

—" माझें पहा ! " " माझें पहा ! "

याचा निकाल कसा करणार ? कोणाच्या घड्याळांत दहाला दहा मिनिटें कमी होतीं, कोणाच्या दहा वाजून दहा मिनिटें झालीं होतीं, आणि बाकीचीं याच्या मधें कोठेतरी होतीं. शिपाई म्हणाला " तें कांहीं नाहीं. माझ्या घड्याळांत दहा वाजले आहेत. मी रपोट करणार. "

इतक्यांत रस्त्यांतून आवाज ऐकूं आले " चोर ! चोर ! खून ! पकडा ! पकडा ! " एक मनुष्य पळत गेला. दुसरे त्याचा पाठलाग करीत होते. अनेक खिडक्या उघडल्या, दिवे लागले, अर्धवट झोपीं गेलेले लोक पुन्हा जागे झाले. दुकानांतले लोक सगळेच बाहेर पडले, आणि शेवटी पळणारा मनुष्य पकडला. कोणीतरी म्हणालें " अरे हा तर **द्युन्वा** !" आणि लोक त्याला बांधून ठेवायच्या तयारीला लागले, पण इतक्यांत त्याच्या नशिबानें त्याचा पाठलाग ज्यांनी सुरू केला होता तीं नवराबायको आलीं. अंधारांत शिपायानें त्यांना ओळखलें नाही. तो म्हणाला " कोण तुम्ही ? " " मीं **ब्रतॉं**. " हें ऐकून दुकानांतल्या गिन्हाइ-कांपैकीं एक दुसऱ्याला म्हणतो " ए बोद्यू, तुझा सासरा आला आहे बघ. "

शिपाई द्युन्वाला म्हणतो " तुम्ही कां याच्या मागें लागलांत ? "

म्हातारा म्हणाला " त्यानें माझ्या... " तो वाक्य पुरें करीना.

**शिपाई**—बोलाना ! काय झालें ?

**म्हातारा**—माझी मुलगी निजली होती तेथे येऊन यानें तिच्यावर बळजबरी केली.

इतक्यांत त्याचा जांवई बोद्यू कोपरांनी वाट काढीत पुढे आला आणि म्हणाला " काय म्हणतां ? "

—कोण, तूं ? ( फ्रान्समध्यें सर्व नात्याच्या माणसांनी एकमेकांशीं एकवचनी बोलण्याची पद्धत आहे—**संपादक** ) मी सांगितलें यांत चूक नाही.

## एका खटल्याची हकीकत

युन्वाविरुद्ध लोक पूर्वी संतापले होते, पण त्यांना हें ऐकून थोडीबहुत गंमतच वाटली. जरी कोणी कांही बोललें नाही, तरी अंधार नसता तर कित्येकांच्या तोंडावर स्मित दिसलें असतें. बोय्यू मात्र संतापला. इतका की त्याच्या तोंडातून शब्द निघेना. तो मुठी वळून युन्वाच्या अंगावर चालून जात होता इतक्यांत शिपाई मधें पडला, तेव्हा त्याला कांही करतां येईना. "हरामखोर!" इतकें म्हणून त्याला स्वस्थ बसावें लागलें.

बलात्कार! या घटनेने त्या लहानशा खेडेगावांत बरीच गडबड उडवून दिली. त्यांना नेहमीचा अनुभव म्हणजे पत्नीने आपलें कर्तव्य म्हणून मधून मधून आपलें शरीर पतीच्या ताब्यांत द्यावें. किंवा कधी शेजारच्या मोठ्या गांवांत जाण्याचा प्रसंग आल्यास तेथल्या एखाद्या वेश्येने पोटाकरतां आपलें शरीर भाड्याने द्यावें. त्यामुळे युन्वाने मोठा पराक्रम केला असें त्यांपैकी बहुतेकांना वाटलें. अर्थात् हें अशा शब्दांनी कोणी बोलून दाखवलें नसतें.

युन्वाला पोलिसाने पकडून नेला. त्याचे कपडे लोकांच्या धक्काबुक्कींत फाटले होते आणि चेहऱ्यावर रक्तही दिसत होतें. त्याच्यामागून बोय्यू आणि त्याची सासू व सासरा आणि त्यांच्यामागून इतर सर्व लोक गेले. अर्थात् पोलीसचौकीवर गेल्यावर बाकीच्या लोकांना परतावें लागलें.

एक म्हणतो "पण त्याची बायको कोठे आहे? आपण तिचें सांत्वन करायला गेलों असतों. हें कसें काय झालें तें तरी कळलें असतें."

हकीकत घडली होती अशी. तो खेडेगांव असल्यामुळे बहुतेक लोक नऊ वाजतांच निजत असत. त्या रात्रीं नवाला ब्रताँ आणि त्याची बायको गाढ झोपीं गेलीं होतीं. त्यांचें घर गांवाच्या एका टोंकाला होतें. दोघांचेंही वय सुमारें बावन वर्षांचें, तेव्हा सारा दिवस काबाडकष्ट केल्यावर त्यांना लवकर झोप लागत असे. रस्त्यावरून दरवाजा त्यांच्याच खोलींत होता, आणि त्यांचें स्वयंपाकघरही तेंच. त्यांची मुलगी आणि जांवई ज्या खोलींत निजत असत, तेथे या बाहेरच्या खोलींतूनच जावें लागत असे. त्यांचें लग्न होऊन चारच महिने झाले होते.

मुलगी बावीस वर्षांची, सुस्वरूप, पण अक्कल बेताबाताची. तरीपण तिच्या वागणुकीबद्दल कोणालाही आजपर्यंत शंका आली नव्हती. तिचा नवराही थोडाबहुत बावळटच, पण कामाला वस्ताद आणि स्वभावाने उत्तम. त्याच्यांत एकच दोष होता, की तो जरी कधी झिंगत नसे, तरी संध्याकाळीं उशीरपर्यंत पानगृहांत बसत असे.

तसाच तो त्या दिवशीं पेशू व ग्रुन्वा यांच्याबरोबर बसला होता. ग्रुन्वा हां त्याचा फार दिवसांचा स्नेही. झकपक पोषाख आणि देखणा असून तो बहुधा बायकांच्या मागे असे. हे तिघे पत्त्यांचा डाव खेळत बसले होते आणि त्यांत ग्रुन्वा एकसारखा हरत होता. पेशू म्हणतो, "हरलास तरी हरकत नाही. हे पैसे कायद्याने वसूल करतां येत नाहीत, आणि दारूचे पैसे तर तूं कधीच देत नाहीस."

—वा ! वा ! मी त्याला कोर्टांत खेचीन, बोद्यू म्हणाला.

—पण कोर्ट हें कर्ज ओळखीत नाही.

बोद्यू चिडून म्हणाला "म्हणजे जगांत कांहीं न्यायच नाही म्हणायचा !"

ग्रुन्वा म्हणाला " घाबरूं नको. दारूचे पैसे मी देतों." आणि त्याने खरोखरच दोन फ्रँक काढून मालकाच्या हातावर ठेवले.

बोद्यू थोडासा वरमून म्हणाला, " पण निघालास कां ? बस की जरा."

—आज पुरे आतां. मी थकलों आहें, मी आतां जाऊन निजतों.

आणि तो खरोखरच निघून गेला, आणि त्याचे मित्र आणखी एक डाव खेळूं लागले. पेशू बोद्यूला म्हणाला, " मला नाही वाटत तो घरीं जाऊन निजेल म्हणून. एखाद्या पात्राला भेटायला जात असेल झालें !"

—गेला तर गेला. आपल्याला काय करायचें आहे ?

—खरी गोष्ट. लोकांनी पाहिजे तर आपल्या बायका कुलपांत ठेवाव्या, नाहीतर त्यांच्यावर पहारा ठेवावा.

बोद्यू म्हणाला, " हें तूं मला म्हणतोस कीं काय ?"

## एका खटल्याची हकीकत

" छे ! छे ! तूं आपला पानें वांट. " आणि खरोखरच पेशू केवळ चेष्टा करण्याकरतां बोलला होता. पण चेष्टेंत बोललेल्या गोष्टी कधीकधी खऱ्या होतात.

युन्वा खरोखरच घरीं गेला नाही. तो बोद्यूच्या घराकडे गेला. तो अलीकडे बऱ्याच वेळां त्याच्याकडे गेला होता. त्यामुळे त्याला त्या घराची चांगली माहिती झाली होती आणि हेंही समजलें होतें की बोद्यू रात्रीं घरीं येईपर्यंत त्याचा सासरा दाराला कडी लावीत नसे. दाराची मूठ धरून फिरवली कीं तें उघडत असे. रस्त्याच्या दारामागेच सासूसासरा डाराडूर निजत असत. आंतल्या खोलींत जायला काडी ओढून मेणबत्ती लावून जायला पाहिजे होतें. " पण काडी कशी मिळणार ? आणि आपण आंतल्या खोलींत पोंचायच्या आंत म्हातारा जागा झाला तर ? " पण अलीकडे त्याला तिच्याशिवाय कांही सुचेनासें झालें होतें. " काय नशीब आहे पहा ! लग्न व्हायच्या आधीं मला कधी तिच्याकडे ढुंकून पहायची बुद्धि नाही झाली. मला वाटलें असतें तर ती काय मिळाली नसती ? सहज मिळाली असती. दुसऱ्या नाही का मिळाल्या ? मग तीच कोण अशी लागून गेली होती ? तसें झालें असतें म्हणजे मी तिला एव्हांना विसरून देखील गेलों असतों, आणि मग रात्रीच्या वेळीं अंधारांत चांचपडत तिच्याकडे जायची वेळच कशाला आली असती ? पण आतां मागें सरून काय होणार ? एकदां तिच्यापर्यंत पोंचलों की मग काम फत्ते. मागून ती कोणच्या तोंडाने बोलेल ? तिची छातीच होणार नाही ! "

शेवटीं त्याने धाडस करून दाराची मूठ फिरवली आणि आंत गेला. पुढे काय झालें तें कदाचित् कोणाला खरें वाटणार नाही, तेव्हा शेवटीं हा खटला वरच्या कोर्टांत गेल्यावर कोर्टाच्या कारकुनाने लिहिलेली हकीकत जशीच्या-तशीच देतों. ' ४ मार्च १८५७ रोजीं युन्वा कांही मित्रांबरोबर दारू पिऊन, त्यांना पानगृहांतच दारू पीत व खेळत सोडून, बोद्यूच्या घरीं गेला.

आणि आंत शिरल्यावर कांही दिसेना, तेव्हा त्याने आवाज बदलून म्हाताऱ्याजवळ काड्या मागितल्या, व म्हाताऱ्याने आपला जांवईच आला आहे असें समजून काड्या कोठे होत्या तें सांगितलें, आणि ग्रुन्वाने आपला चेहरा दिसणार नाही अशी खबरदारी घेऊन एक काडी ओढली व तो आंतल्या खोलींत जेथे बोद्यची बायको निजली होती तेथे गेला आणि अंगावरचे कपडे न काढतांच तिच्या पांघरुणांत शिरला. ती अर्धवट झोपेंतच होती आणि नवराच आला असें वाटून ती म्हणाली, " किती उशीर हा ? " अर्थात् आपला नवराच आपल्या जवळ आहे असें वाटल्यामुळें तिने त्याला कोणत्याही प्रकारचा अडथळा केला नाही. पण नंतर मात्र तिला थोडा संशय आला आणि मग खात्रीच झाली. तेव्हां तिने मोठ्याने ओरडून ग्रुन्वाला दूर ढकलला, आणि तो ताबडतोब उठून पळून गेला.' तिला संशय कशामुळे आला हें कोर्टाच्या हकीकतीवरून दिसत नाही, पण ग्रुन्वाला कसा पकडला हें वाचकांस माहीतच आहे.

दुसऱ्या दिवशीं सगळा गांव हेंच बोलत होता, त्याला काय शिक्षा होईल ? निदान दोन वर्षांची तरी सजा मिळेल. बोद्यूलाही विचारायला लोकांनी कमी केलें नाही. तो म्हणाला " मी नुकसानभरपाई म्हणून निदान दहा हजार फ्रँक तरी मागेन. " लोकांना माहीत होतें की त्याला जरी खायला पुरेसें मिळत होतें तरी त्याच्याजवळ पांचशें फ्रँक देखील शिल्लक असले तर नशीबच ! पण तो बराच बलवान व रागीट असल्यामुळे कोणी जास्त बोललें नाही. त्याच्या बायकोला देखील विचारायला लोकांना आवडलें असतें, पण तिने अंथरुणच धरलें होतें. तिच्या सासूने डाक्तराला बोलावलें होतें, आणि त्यांच्या मतें ती आजारीही नव्हती, आणि तिला कांही इजाही झाली नव्हती. तरीपण ती बिछान्यावर होती खरी.

इकडे ग्रुन्वाला तुरुंगांत नेला होता. एक जज्ज त्या गांवीं येऊन सर्वांच्या साक्षी घेऊन गेला. ( फ्रान्समधील न्यायदानाची पद्धत इंग्लंडपेक्षा वेगळी आहे. **संपादक** ) त्या गांवांतल्याच नव्हे तर खुद्द पॅरिसमधल्या वर्तमानपत्रांनीं ही हकीकत छापली. एका वर्तमानपत्राचा प्रतिनिधी बोद्यूची मुलाखत

घ्यायला आला. पण बोग्र्यू त्याला दारच उघडीना. शेवटीं मेयरला मधें पडावें लागलें आणि बोग्र्यूने सर्व हकीकत सांगितली. त्याला त्रास दिल्याबद्दल जेव्हां त्या प्रतिनिधीने जातांना त्याच्या हातावर वीस फ्रँक ठेवले, तेव्हां मात्र तो खुष झाला. तो म्हणाला " असे आणखी बातमीदार आले तरी चालतील. " दुर्दैवाने आणखी बातमीदार तर आले नाहीतच, पण रिकामटेकड्या लोकांना कांहींतरी निमित्त काढून तेथे जाण्याची इच्छा अनावर होऊन अशा प्रवाशांची तेथे गर्दी झाली. जोजेफीन ( बोग्र्यूची बायको ) आहे तरी कशी हें पाहण्याची सर्वांना इच्छा, पण ती सफल होत नसे. त्यांतल्या एका गटाने तर हाटेलवाल्याला तिला बोलवायला पाठवलें. पण अर्थातच् ती गेली नाहीं. पॅरिसमधले एक विशेष उल्लू गृहस्थ तर कांहीं झालें तरी तिला पहायचेंच या इराद्यानें तेथेच कांही दिवस मुक्काम करून राहिले, पण त्या घरावरून जाण्यापलीकडे या लोकांना कोणतेंही समाधान लाभलें नाहीं. गांवांतल्या हाटेलांना व पानगृहांना मात्र चांगलीच प्राप्ति झाली. पण कांही दिवसांनीं पाहुण्यांचा ओघ ओसरला आणि त्यांचा नफा कमी होऊं लागल्याबरोबर हे लोक बोग्र्यूच्याच उलट फिरले. कारण तो बायकोला दाखवीत नसल्यामुळें लोक यायचे कमी झाले आणि तो व्यापाराच्या आड येतो म्हणून लोक त्यावर चिडले. ते इतके की युन्वानें जर आपला गुन्हा कबूल केला नसता, तर जोजेफीनचीच त्याला फूस होती अशी साक्ष द्यायला या लोकांनी कमी केलें नसतें !

लोकांचा फारच त्रास होऊं लागला असें पाहून तिच्या बापाने आणि नवऱ्याने शेवटीं तिला सांगितलें की " हें आजारीपणाचें ढोंग आतां बस झालें. आतां तुला नेहमीप्रमाणें राहिलें पाहिजे ". तिला तें मोठेंसें आवडलें नाही, पण इलाज नव्हता. ती नेहमीसारखी हिंडू फिरूं लागल्यावर लोकांचा रोषही कमी झाला.

( अपूर्ण )

---

# ‘ हंस पिक्चर्स ’ची ‘ देवता ’

लेखक, वि, स. खांडेकर. दिग्दर्शक, विनायक. हंसच्या किंवा खांडेकरांच्या पूर्वीच्या कोणत्याही बोलपटापेक्षा हा बोलपट सरस वठला आहे. त्यांत किरकोळ किंवा मोठे दोषही नाहींत असें नाही, तरीपण तो शेवटपर्यंत पहावासा वाटतो. ध्वनिलेखन व छायालेखन मागील बोलपटांपेक्षा पुष्कळच चांगलें आहे.

यांतील एक ढोबळ चूक म्हणजे अशी की ‘ देवता म्हणून स्त्रीची समाजांत, संसारांत पूजा व्हायला हवी ’ ही जी कल्पना लेखकाने नायकाच्या तोंडांत घातली आहे, ती मुळांतच चुकीची आहे. स्त्रीला पायांखाली तुडवल्यामुळें पश्चात्ताप होऊन दुसऱ्या बाजूनें अतिरेक करण्याची ही प्रवृत्ति अत्यंत घातक आहे आणि ती केवळ पुरुषांनाच नव्हे तर स्त्रियांनाही जाचक झाल्याशिवाय राहणार नाही. या कल्पनेविरुद्ध स्त्रियांनीच बंड करायला पाहिजे आहे. या कल्पनेमुळेच या गोष्टींतली देवता **सुशीला** ( इंदिरा वाडकर ) हिला अखेरपर्यंत प्रेमाचा स्पर्श देखील होत नाही. तिला फक्त आपल्या भावाबहिणींची काळजी वाटते आणि त्यांच्याच कल्याणाकरतां ती श्रीमंत दासोपंताशीं लग्न करते. दासोपंताचा मुलगा प्रो. अशोक हा समाजसेवक आहे, आणि तो आपल्या बापाला व सुशीलेलाही या लग्नाविरुद्ध दोन गोष्टी सांगतो, पण दोघेंही ऐकत नाहीत. ‘त्यागाची धुंदी चढली होती माझ्या डोळ्यांवर ’ असे उद्गार नंतर सुशीलेच्या तोंडांत घातले आहेत. पण कसला त्याग ? तिचें कोणावरही प्रेम नव्हतें. तिने भावाबहिणीबरोबर स्वतःच्याही चैनीकरितांच हें लग्न केलें नाही कशावरून ? लेखक तसें सांगतो यापलीकडे याला पुरावा नाहीं ! तिचें कोणावर प्रेम आहे असें दाखवलें असतें, तर तिच्या त्यागाला जो उठाव मिळाला असता, तो कथानकाला पोषकच झाला असता. पण देवतेचें प्रेम कोणावर बसावेंच कसें ? या विवाहापासून आपणास परावृत्त करूं पहाणारा प्रो. अशोक हा आतां आपला मुलगा झाला असें कळल्या-

वर ती त्यावर जें मातृप्रेम दाखवते तेंही अत्यंत कृत्रिम दिसतें. तें मातृप्रेम समजून ती स्वतःची फसवणूक करीत आहे, असा ध्वनि जर कोठे निघाला असता तर रसपोषच झाला असता. पण नाही, ती दासोपंतांच्या सांगण्यावरून लंबेबुवांच्या सेवेकरतां मठांत जाऊन तेथून कशीतरी सुटून अशोकाकडे येते आणि त्याला मिठी मारते, आणि तें अशोकावर प्रेम करणाऱ्या पुष्पाच्या नजरेस पडतें, हें दृश्य पुढे दाखवायचें होतें ना! तेव्हा तिच्या मनांत अशोकाविषयी कामुक प्रेम असल्याचा भास प्रेक्षकांसही होतां नये, इतकेंच नाही तर तो तिचा खरा मुलगा नसतांही ती त्याला मिठी मारील इतकें मातृप्रेम अगोदर दाखवून ठेवावें लागलें, मग तें प्रेक्षकांना कितीही कृत्रिम दिसो. या घटनेमुळे अशोकला नोकरीचा राजीनामा द्यावा लागतो, पुष्पा त्याच्यावर रागावते, तो आईला आपल्याकडेच ठेवून घेतो, परंतु त्याला नोकरी तर राहोच, पण शिकवणीही मिळत नाही असें पाहून ती निघून जाते आणि रेडिओवर गाण्याची नोकरी मिळवते. इकडे दासोपंत तिच्या भावाला घालवून देतो, तेव्हा तोही अशोककडेच आलेला असतो, पण बहिणीला मात्र घालवून देत नाही, कारण स्वतःच्या मुलांच्या अभावीं तो तिच्या बरोबरच खेळतो. शेवटीं या मुलीच्या हट्टामुळें त्या सर्वांचें पुनर्मीलन होतें व पुष्पाचाही राग जाऊन सर्व सुखी होतात.

या पटाचें दिग्दर्शन जरी सामान्यतः चांगलें आहे, तरी त्यांतही चूक नाही असें नाही. अशोकच्या डोक्याला साहेबी टोपी असते, परंतु ती कशी वापरावी हें त्याला समजत नाहीं. कोणाच्याही घरांत किंवा खोलींत शिरल्या-बरोबर ती काढून हातांत घ्यावी लागते, ही अगदी साधी गोष्ट त्याला माहीत नाही, आणि तो इराणांतून परत आलेल्या बापाला हॉटेलांत भेटायला जातो तेव्हा त्याच्या पलंगावर बसून खुशाल अर्धा तास पर्यंत डोक्यावर हॅट ठेवूनच गप्पा मारतो. गांवढळ लोकांना यांत कांहीं वाटणार नाही, पण दिग्दर्शकांना ही गोष्ट समजली पाहिजे. त्याचप्रमाणे सुशीलेची बहिण प्रेमा जेव्हा तिचा आवाज रेडिओवर ऐकून तिला ओळखते, तेव्हा आरंभी थोडीशी कृष्णाची गोष्ट सांगून नंतर गाण्याला सुरवात केलेली आहे. ती गोष्ट ऐकत असतांना प्रेमा तिचा

आवाज बिलकूल ओळखीत नाहीं, आणि गाणें ऐकल्यावर मात्र ओळखते, ही चूक आहे. ओळखीचा आवाज गाण्यापेक्षा भाषणांतच जास्त ओळखेल. तसेंच दिग्दर्शकांनीं स्वतःच कॉलेजच्या प्रिन्सिपालचें काम केलें आहे, तेथे त्यांनी एमील झोलासारखें रूप धारण केलें आहे, हें अत्यंत अनुचित आहे, कारण झोलासारखी त्यांची वागणूक बिलकुल नाही. आपणास झोलासारखें स्वरूप बनवतां येतें इतकेंच त्यांना दाखवायचें होतें असें दिसतें. पण त्यांत विशेष काय आहे ?

यांतील इतर पात्रें म्हणजे अशोकच्या अबलाश्रमांतील सहकारी चिंतोपंत आणि त्यांचें प्रेमपात्र मैना म्हणजे पुष्पाची मावशी. ही एक श्रीमंत, रंगेल, नाजूक विधवा ( मिस सरदार ) असून आजारीपणाचें ढोंग करते. स्वरूपाच्या बाबतींत मीनाक्षी व इंदिरा वाडकर यथातथाच असल्यामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांना विरंगुळा म्हणून या पात्राचा उपयोग होतो. मीनाक्षी निदान तरुण तरी आहे, सुशीला देवता असल्यामुळें तिला तारुण्याची जरूरच नाही असें दिसतें ! ' हिरव्या शालूला हिरवाच शेला शोभतो ' हें सुशीलेचें वाक्य ऐकून प्रेक्षकांना हंसूं मात्र येतें, तिची बिलकुल कींव येत नाही. येथे सर्वच दिग्दर्शकांना एक सूचना करावीशी वाटते, की त्यांनी दिग्दर्शनाचे बाबतींत एखाद्या स्त्रीची मदत घेतल्यास स्त्रियांचीं कामें अधिक चांगलीं होतील. उदाहरणार्थ प्रेमाला शोभून दिसणारा लडिवाळपणा पुष्पाला शोभत नाही, हें सहज कळण्यासारखें आहे, आणि तें कदाचित् दिग्दर्शिकेच्या चटकन लक्षांत आलें असतें. एकट्याच्या अक-लेवर अवलंबून न राहतां जरूर तेथे अशी मदत घेतल्यास दिग्दर्शकांना कांही कमीपणा येईल असें वाटत नाही.

अबलाश्रमांतील तारा अशोकला प्रेमपत्रें लिहिते, व तो तिला उलट उत्तर लिहितो की काय याची चौकशी केल्याशिवाय अशोकच्या विरुद्ध तो एक पुरावा समजला जातो आणि पुष्पाच्या असुयेंत भर पडते, आणि सावत्र आईला मिठी मारण्याच्या देखाव्यामुळें चिडून जाऊन तीही अशोकच्या विरुद्ध साक्ष देते. याव-

रून तिचें प्रेम फारसें उच्च दर्जाचें दिसत नाही व ती अशोकसारख्या मनुष्याच्या प्रेमाला योग्य नाही असें वाटतें. तिला त्याच्याबद्दल संशय आला नाही असें दाखवलें असतें तर अधिक बरें झालें असतें, आणि तसें करण्यांत अडचण कांहीच नाही. स्त्रीला देवता म्हणणारांनीं तरी तिची वृत्ति इतकी संशयी दाखवूं नये. या देवतेचा आणखी एक प्रकार म्हणजे अशोकची आई त्याला जन्म देतांना मरते आणि आपण मेलों तरी हरकत नाही पण मूल जगलें पाहिजे, अशी वृत्ति दर्शवते. ही वृत्ति स्वाभाविक नाही. जगांत गर्भपात करणाऱ्या स्त्रियांची संख्या किती आहे याची खांडेकरांना कल्पना नसावी. इतकेंच काय, पण मूल उपजल्याबरोबर त्याला गळा दाबून मारणाऱ्या आयाही थोड्या नसतात, आणि त्या केवळ समाजाला भिणाऱ्या अविवाहित मुली किंवा विधवाच असतात असें नाही. विवाहित स्त्रियाही गर्भपात करण्यास अत्यंत उत्सुक असतात असा आमचा अनुभव आहे. मात्र मूल उपजून तें अंगावर पिऊं लागल्यावर त्याला मारणारी स्त्री सांपडत नाही. तेव्हा स्त्रीचें नैसर्गिक अपत्यप्रेम दुग्धपानापासून सुरू होतें असें म्हणावें लागतें.

स्त्रीपुरुषांनी बरोबरीच्या नात्याने वागण्यांत आणि एकमेकांना वागवण्यांत खरें सुख आणि खरें समाजहित आहे. स्त्रीला देवता किंवा पतीला देव म्हणणें दोन्हीही सारखींच हानिकारक आहेत. याप्रमाणे या बोलपटांत अनेक दोष असले तरी एकंदरींत तो पाहण्यासारखा झाला आहे यांत शंका नाही.

---

# संपूर्ण आहार

—:o:—

शरीरास प्राणिजन्य प्रोटीन अत्यंत महत्वाचीं आहेत, परंतु कित्येकांना धार्मिक समजुतीमुळे मांसाहार पसंत नसतो. तथापि जे शाकाहारी म्हणवणारे लोक दुधदुभतें वर्ज्य मानीत नाहीत, त्यांनी पुढे दिलेला आहार घेतल्यास त्यांत फारशी कमतरता राहणार नाही असें म्हणण्यास हरकत नाही. या आहाराची कल्पना डॉ. एस.

बी. गाडगीळ यांची आहे, परंतु आम्ही त्यांत कांही किरकोळ फरक केला आहे.

| पदार्थाचे नांव | वजन औंस | प्रोटीन ग्रॅम | चरबी ग्रॅम | कार्बोहा. ग्रॅम | कॅलोरी |
|---|---|---|---|---|---|
| म्हशीचें दूध | १६ | २१.६० | ३४.८८ | १९.८४ | ४७९.६८ |
| चीज ( पनीर ) | १ | ७.३५ | ८.८८ | ०.५० | १११.३२ |
| ताक | १६ | १३.६० | २.२४ | २१.७६ | १६१.६० |
| चपाती ( गहूं ) | ६ | २३.४० | ३.२४ | १२२.१० | ६११.१६ |
| डाळ | ४ | २६.०० | ३.९६ | ६४.८० | ३९८.८४ |
| भात | ४ | ९.२० | ३.४० | ८९.२० | ४२४.२० |
| बटाटे | ४ | २.८० | ०.१६ | ३२.६० | १४३.०४ |
| पालेभाजी | ४ | २.२४ | ०.२४ | ३.२८ | २४.२४ |
| लोणी | २ | ०.०० | ४६.२० | ०.०० | ४१५.८० |
| साखर | २ | ०.०० | ०.०० | ५६.६० | २२६.४० |
| एकूण | ५९ | १०६.१९ | १०३.२० | ४१०.६८ | २९९६.२८ |

शंभर ग्रॅम प्रोटीन, १०० ग्रॅम चरबी व ४०० ते ५०० ग्रॅम कार्बोहायड्रेट्, हा युरोपांत पुरा आहार समजलेला आहे, आणि वरील आंकडे जवळजवळ असेच आहेत. यांत बहुजनसमाजाच्या नेहमीच्या संवयीच्या बाहेरचा पदार्थ म्हणजे 'चीज'. तें बाजारांत विकत मिळतें आणि दुधापासूनच केलेलें असतें ( पनीर हा चीजचाच प्रकार आहे ) तेव्हा त्याला कोणाची हरकत असूं नये. डॉ. गाडगीळ यांनीं यांत आणखी 'ओटमील' ( ओटचें पीठ ) घातलें होतें. त्यांत दर औंसामागे ३.३७ प्रोटीन, २.४३ चरबी, व १९.८१ कार्बोहायड्रेट् असतात. हाही पदार्थ बहुजनसमाजाच्या परिचयाचा नाही, पण तोही शहरांत मिळतो. दूध, चीज, ओटमील, हे पदार्थ महाग असतात आणि वरील आहारांत दूध, ताक, लोणी व चीज हे पदार्थ बऱ्याच प्रमाणांत असल्यामुळे तो श्रीमंतांच्याच उपयोगाचा आहे असा आक्षेप त्यावर येईल.

परंतु श्रीमंतांना देखील पुष्कळ वेळां काय खावें हें कळत नाहीं, आणि त्यांचाहि विचार आहारतज्ञांना करावा लागतो. मांसाहार ज्यांना चालत असेल त्यांचें कमी खर्चांत भागेल, परंतु मांसाहाराचें मुख्य काम दुधानें करायचें असलें म्हणजे खर्च जास्त येणारच. आहार चांगला कोणता एवढेंच आहारतज्ञांना सांगतां येईल, इतर अडचणींतून मार्ग कसा काढावा हें ज्याचें त्यानें ठरवा-यचें आहे.

---

# ग्रंथपरीक्षण

—:*:—

**विशिष्ट विवाहाचा कायदा,** लेखक व प्रकाशक के. बा. गजेंद्रगडकर बी. ए. ( ऑनर्स ) एलएल्. बी., वकील, सातारा. पृष्ठें २२, किंमत ३ आणे.

सरकारी ' रजिस्ट्रार ' पुढें विवाहबद्ध होण्याची रीत अधिकाधिक पसरत आहे. हा विवाह ज्या कायद्याअन्वयें होतो त्याची माहिती या पुस्तकांत थोडक्यांत दिली आहे. शिवाय चार परिशिष्टांत ' वर्णनिर्बंध व सपिंड्य, ' ' इंडियन् सक्सेशन् अॅक्ट ' ( अशा विवाहितांस लागू होणारा वारसाचा कायदा ), घटस्फोटाचा कायदा आणि विवाहाच्या कायद्यांत सांगितलेल्या शिक्षा, यांचा विचार केला आहे. माहितीच्या दृष्टीनें हें पुस्तक उपयुक्त होईल यांत शंका नाहीं.

कांहीं मुद्यांवर मतभेद होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ ' विशिष्ट विवाह ' केल्यानंतर धार्मिक विवाह केल्यानें या पवित्र विधीचा अपमान होतो एवढ्याकरतां तो करूं नये असें लेखकाचें म्हणणें आहे, आणि त्या विवाहाचें बंधन मात्र होत नाहीं असें मत आहे. ( याच अंकांतील लेखकाचें पत्र व त्याला उत्तर पहा. ) तसेंच एकपत्नीत्वाचा अभाव हा अन्याय आहे असें लेखकाचें मत आहे. परंतु या प्रश्नाला दोन बाजू आहेत. रखेली ठेवण्याचा प्रघात फार प्राचीन आहे व रखेलीच्या अपत्यांस देखील वारसा हक्क

कोर्टाकडून मिळतो, फक्त समाजांत त्यांना गौणत्व येतें. रखेली ठेवण्या· ऐवजी दुसरें लग्न केल्यास हें गौणत्व रहात नाही. यांत अन्याय कोठे होतो ? अर्थात् रखेली ठेवावीच कां, हा प्रश्न विचारतां येईल. पण या बाबतींत कायद्याच्या निर्बंधांचा उपयोग होत नाही आणि विवाहबाह्य संबंध सर्व जगभर निदान पुरुष तरी ठेवतात ( स्त्रिया निदान उघडपणें ठेवीत नाहींत ). नीतीचे नियम मनुष्यस्वभावाला धरून असतील तरच त्यांचा अंमल चालतो, एरवी लोक त्यांतून पळवाटा काढतात.

कायद्याच्या कलमांचें स्पष्टीकरण करतांना, जवळच्या नात्याच्या वधूवरांचें लग्न होऊं नये, याचें स्पष्टीकरण असें दिलें आहे की वधू किंवा वर यांचा संबंध पांच पिढ्यांपर्यंत येतां कामा नये. आम्हीं स्वतः रजिस्ट्रारचे कचेरींत जाऊन याविषयी माहिती विचारली होती, आणि कायद्याचें पुस्तकही पाहिलें होतें, व त्यांत मागील तीन पिढ्यांत वधू व वर यां दोहोंचाही पूर्वज असा पुरुष किंवा स्त्री नसल्यास तें लग्न होऊं शकतें, अशी टीप वाचलेली स्मरते. तेव्हा हिंदू नियम जरी पांच पिढ्यांचा असला, तरी या कायद्यांत तीन पिढ्यांचाच धरलेला आहे असें दिसतें.

या कायद्यापासून होणारे जे फायदे दिले आहेत ( पान १४ ), त्यांत पुरुषाला पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरें लग्न करतां येत नाही, हा एक दिला आहे. हा पुरुषाच्या दृष्टीने फायदा नाही. स्त्रियांच्या दृष्टीने पाहिलें, तर असें म्हणतां येईल कीं आपल्या नवऱ्याने दुसऱ्या कोणाशीं संबंध ठेवला तर तो निदान कायदेशीर तरी असूं नये, असेंच ज्यांना वाटत असेल त्यांची इच्छा पुरी होईल. परंतु याचा अर्थ इतकाच होतो की अशा दुसऱ्या स्त्रीला पत्नीचें स्थान मिळणार नाही. यामुळे पत्नीला काय समाधान वाटेल तें वाटो, पण यापलीकडे कांही फायदा नाही. लेखकाने म्हटलें आहे की प्रथम पत्नी हयात असतां दुसरी करण्याची अनिष्ट रूढि समाजांत पसरत आहे. हें मात्र तितकेंसें खरें नाही. ही रूढि फार जुनी आहे, अलीकडे सुशिक्षित लोकांचें प्रमाण वाढल्या-

मुळे ती सुशिक्षित लोकांत दिसूं लागली आहे, आणि पूर्वी या गोष्टीचा बभ्रा होत नसे, तो हल्ली स्त्रिया सुशिक्षित झाल्यामुळे होऊं लागला आहे, इतकेंच.

पहिल्या परिशिष्टांत असें एक विधान आहे की सापिंड्याच्या बाबतींत सनातनधर्मशास्त्र व अगदी आधुनिक शास्त्रज्ञांचें मत यांची अगदी एकवाक्यता आहे (पान १६), तेंही तितकेंसें खरें नाहीं. सपिंड वधूवरांत जर कांही आनुवंशिक दोष असतील तर ते संततींत द्विगुणित होण्याचा संभव असतो, इतकेंच आधुनिक शास्त्र सांगतें. सरसकट सपिंडांचा विवाह होऊं नये असें सांगत नाहीं. कारण आनुवंशिक दोषांप्रमाणेंच आनुवंशिक चांगले गुण देखील द्विगुणित होतात, आणि अशा वेळीं सपिंडांचा विवाह उत्कृष्ट समजावा लागेल. विवाहाविषयी पारंपरिक धार्मिक समजुतींवरच सर्वत्र कायद्याचे निर्बंध बसवलेले आहेत आणि ते शास्त्रीय माहितीशी जुळण्याचा फारसा संभव नसतो. शास्त्रीय दृष्ट्या निर्बंध घालणें झाल्यास, जेव्हा सपिंडांच्या विवाहाचा प्रश्न निघेल तेव्हा अशा वधूवरांची वैद्यकीय तपासणी व आनुवंशिक इतिहास यांवरून त्यांच्यांत कांही आनुवंशिक दोष आहेत असें दिसल्यासच त्यांना मनाई करावी, एरवीं करण्याचें कारण नाही. सर्वांना सरसकट नियम करणें योग्य नाही. तेव्हा सपिंडांच्या विवाहाची चाल ज्या जातींत अजून असेल त्यांनी ती आतां सोडून द्यावी हा लेखकाचा उपदेश (पान १८) शास्त्रीय दृष्टीला धरून नाही.

घटस्फोटाचा कायदा दुरुस्त करून घेतला पाहिजे हें लेखकाचें म्हणणें योग्यच आहे, परंतु क्षुल्लक कारणाने घटस्फोट देणें योग्य नाही असें त्यांचें मत दिसतें. त्यांत एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की घटस्फोट जरी क्षुल्लक कारणाकरतां मागितला, तरी त्याचें वास्तविक कारण कधीच क्षुल्लक नसतें. कोर्टांत येणारें कारण क्षुल्लक असतें इतकेंच, कारण खरें कारण सांगण्यासारखें नसतें! आमचे मतें कोणाही एकाच्या म्हणण्यावरून घटस्फोट द्यावा हेंच योग्य आहे.

र. धों. क.

# स्नायुबल आणि आरोग्य

---:o:---

स्नायुबल म्हणजे आरोग्य नव्हे, इतकेंच नाही तर कित्येक वेळां स्नायुबल मिळवण्याचा प्रयत्न आरोग्याला विघातक होतो, हें पुष्कळांना खरें वाटत नाही. शक्ति म्हणजे आरोग्य, अशी पुष्कळांची कल्पना असते, पण ती अजीबात खोटी आहे. यासंबंधी 'अमेरिकन मेडिकल् असोसिएशन्' ने चालवलेल्या 'हायजिया' नामक मासिकांत आलेलीं पुढील प्रश्नोत्तरें लक्षांत घेण्यासारखीं आहेत. ( जानेवारी १९३९ चे अंकांत )

**प्रश्न.** वजन उचलणारांच्या स्नायूंची जी फाजील वाढ होते, तिने आयुष्य कमी होतें काय ? होत असल्यास अशा सशक्त लोकांना कोणत्या रोगांपासून विशेष भीति असते ? किंवा याउलट हळूहळू अधिकाधिक वजन उचलण्याची संवय केल्याने शक्ति आणि आरोग्य दोन्हीही वाढून असे लोक जास्त जगतात काय ?

**उत्तर.** स्नायूंना जें जें काम द्यावें, तें तें करण्यास शिकण्याची विलक्षण शक्ति मनुष्याच्या स्नायूंत आहे. योग्य मर्यादेंत व्यायाम घेतल्यास स्नायूंचा आकार आणि शक्ति दोन्ही वाढतात, परंतु त्यांना योग्य विश्रांति आणि योग्य अन्न मिळालें पाहिजे. जड वजन उचलण्यापासून स्नायूंची जी फाजील वाढ होते, ती प्रकृतीच्या दृष्टीने जरूरही नाहीं आणि इष्टही नाही. स्नायूंना फाजील ताण पडेल असें काम करूं नये, आणि वजन उचलण्यांत स्नायूंच्या शक्तीच्या कमाल मर्यादेपर्यंत पोंचूं नये. कमाल मर्यादेच्या आंत व्यायाम असेल, तरच त्यापासून फायदा होतो. त्या मर्यादेपर्यंत गेल्यास एखादेवेळीं स्नायु तुटेल, किंवा निदान रुधिराभिसरणावर ताण पडेल. एखाद्या धंद्यालाच विशेष शारीरिक शक्तीची जरूर असल्यास वेगळें, पण सामान्यतः शारीरिक शक्तीची इतकी जरूर नसते. शक्तीचें प्रदर्शन करणारांना किंवा गोदींतल्या हमालांना शक्तीची जरूर

असते. परंतु इतर पुष्कळ धंद्यांतील लोकांना धंद्याकरतां किंवा प्रकृतीकरतांही विशेष शक्तीची जरूर नसते इतकेंच नव्हे, तर ती कधीकधी बाधक होते.

व्यायामाचे सामान्यतः तीन प्रकार मानतात. शक्तीचे व्यायाम, चपळाईचे व्यायाम, आणि सहनशक्तीचे व्यायाम. शक्तीचे व्यायाम, उदा० वजन उचलणें, अतिशय ताण देऊन सावकाश करायचे असतात, आणि त्यांनी स्नायूंचा आकार व शक्ति वाढतात पण कृति सावकाश होते. चपळाईच्या व्यायामांत, उदा० पळण्यांत, स्नायूंना आणि मज्जातंतूंना जलद काम करण्याची संवय होते. सहनशक्तीचे व्यायाम माफक ताण देऊन आणि माफक वेगाने करायचे असतात, परंतु ते जास्त वेळपर्यंत करायचे असतात, उदा. लांब अंतर चालणें. ज्या व्यायामांपासून मानसिक आल्हाद होतो, ते अतिशय महत्वाचे होत. वजन उचलण्यापासून मानसिक आल्हाद होतो असें कोणी म्हणणार नाही. अर्थात् जो व्यायाम एकाला मानवेल तो कदाचित् दुसऱ्याला मानवणार नाही, तसेंच जो व्यायाम तारुण्यांत मानवेल तो उतार वयांत मानवणार नाहीं. निदान वजन उचलण्याच्या व्यायामासंबंधी तरी असें म्हणतां येईल की त्याने जीवनशक्ति वाढत नाही आणि आयुष्यही वाढत नाही.

यासंबंधी एका प्रख्यात युनिव्हर्सिटींतील शरीरशास्त्रज्ञाने पुढील मत दिलें आहे "वजन उचलणारांच्या आयुष्यमानांसंबंधी आंकडे कोणीं दिलेले नाहींत, परंतु गलबतांवरून जड सामान काढणारे किंवा वर चढवणारे हमाल पुष्कळ वेळां हृदयाच्या विकाराने मरतात. इतर व्यायामांसंबंधी कांही आंकडे मिळवलेले आहेत. इंग्लंदांत क्रिकेट खेळणाऱ्या २४२४ लोकांवरून असें दिसतें कीं त्यांचें आयुष्यमान सरासरीपेक्षा जास्त होतें. ऑक्स्फर्ड, केंब्रिज व येल् या युनिव्हर्सिटींतील वल्हवण्याचा व्यायाम करणारांच्या आयुर्मानांत व्यायामाने कांही फरक झालेला दिसला नाहीं. 'कार्नेजी फाउंडेशन बुलेटिन्'मध्यें १९२९ सालीं असें प्रसिद्ध झालें होतें की कालेजांतील शारीरिक खेळ खेळणारे लोक इतरांइतकेच जगतात. उलटपक्षीं बेयर यांनी १९११ सालीं आरमारांतील ५८० सामान्य लोक, आणि

६२२ शारीरिक व्यायाम करणारे लोक यांची तुलना करून असा निष्कर्ष काढला की व्यायाम करणारांत मृत्युमान जास्त होतें."

एकंदरींत यावरून पहिलवानी व्यायामाने निदान आयुष्य वाढत नाही हें निसंशय दिसतें. क्रिकेट किंवा इतर खेळ हे पहिलवानी व्यायामांत धरतां येणार नाहीत. ज्यांनी शरीराला व्यायाम होऊन मनालाही आल्हाद होतो, असे खेळ प्रकृतीच्या दृष्टीने सर्वांत चांगले. तरी देखील यांतही मर्यादेबाहेर व्यायाम झाल्यामुळे नुकसान झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. केवळ स्नायुवर्धक व्यायाम फाजील झाल्यामुळे कामवासना कमी होते, किंवा नपुंसकत्वही येतें, असें जें आम्ही कित्येक प्रख्यात डाक्तरांच्या अनुभवावरून लिहिलें, त्याविषयीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. हा दोष कबूल करायला लोकांना लाज वाटते; यामुळे डाक्तरांशिवाय इतरांना तो कळत नाही. खुद्द आमचेकडेही यासंबंधी सल्ल्याकरतां आलेल्या लोकांत पुष्कळ लोक व्यायाम करणारे आणि शरीराने धड-धाकट दिसणारे असतात. तथापि नपुंसकत्वासंबंधी त्यांना सल्ला पाहिजे असतो.

---

# स्तन कसे असावे?

(फ्रेंचचे आधारें)

प्राचीन कालापासून स्तनांचें सौंदर्य वर्णन करण्यांत अनेक कवींनी आपली प्रतिभा खर्ची घातली आहे आणि स्तनांसंबंधी अनेक आख्यायिका प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत होत्या. याचें कारण कदाचित् इतकेंच असेल कीं हें सौंदर्य क्वचितच आढळतें आणि असलें तरी तें फारच थोडे दिवस टिकतें. होमरच्या 'इलिअड' नामक काव्यांतील युद्धाचें कारण झालेली जी 'हेलन ऑफ ट्रॉय्' तिने तेथील एका देवळाला एक सोन्याचा पेला बक्षिस दिला, व त्याचा आकार तिच्या स्वतःच्या स्तनावरून माप घेऊन बनवला होता, अशी

एक गोष्ट आहे. त्याचप्रमाणें फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळची फ्रान्सची राणी 'मारी आंत्वानेत्' हिने एका शाळेंतील मुलांना दूध पाजण्याकरितां स्तनांच्या आकाराचे पेले करण्यास सांगितले होते, आणि असें म्हणतात की तिने तो आकार स्वतःच्या स्तनावरून घ्यायला सांगितला होता. फ्रान्समधें सेव्ह्र येथे जो चिनी मातीचा कारखाना आहे, तेथे हा आकार अजून ठेवलेला आहे. यांत विशेष नवल वाटण्यासारखें कांही नाही, कारण फ्रान्समधील सोळाव्या व सतराव्या शतकांतील उच्च घराण्यांतील कांही सुंदर स्त्रियांच्या चित्रांत त्यांचे स्तन उघडे दाखवलेले दिसतात.

अर्थात् सौंदर्याच्या वेगवेगळ्या कल्पनांचा आणि इतर चालीरीतींचा स्तनांच्या आकारावर परिणाम होतो, उदाहरणार्थ मध्ययुगीन यूरोपांत ख्रिस्ती धर्म जेव्हा अत्यंत भरभराटींत होता, तेव्हा स्त्रीचें सौंदर्य हें केवळ पापमार्गाला जाण्यांचें कारण समजत असल्यामुळे स्त्रियांचें हें वैशिष्ट्य दिसणार नाही अशा प्रकारचा पोषाख करण्याची पद्धत पडली होती व स्तन कृत्रिम रीतीने दाबून छाती सपाट करीत असत. परंतु पुढे जेव्हा कलांचें पुनरुज्जीवन झालें तेव्हा चित्रकारांनी आणि शिल्पकारांनी स्तनांना पुनः महत्त्व दिलें. १८ व्या शतकांत आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभीं स्त्रियांच्या छातीचा वरचा भाग उघडा ठेवण्याची पद्धत होती. त्यावेळीं कमर आवळून स्तन उचलून धरण्यासारखें कॉर्सेट नांवाचें एक बंधन वापरीत असत, आणि स्तन पुरेसे मोठे नसल्यास खोटे लावण्याचीही पद्धत होती. जरूर तर खोटे स्तन लावण्याचा सल्ला ओव्हिड् नांवाच्या रोमन कवीनेही स्त्रियांना दिला होता. अलीकडे पंचवीस वर्षांपूर्वीपासून स्त्रियांचें शरीर पुरुषी दिसावें अशी प्रवृत्ति झाली होती. परंतु ती पुनः बदलत आहे आणि स्तनांना आपली जागा पुनः मिळत आहे.

स्तनाच्या कातडीच्या आंत एक चरबीचा थर असतो, आणि त्याच्या आंत त्याचा उपयुक्त दुग्धोत्पादक भाग असतो. स्तनांना आधार असा फार थोडा असतो, यामुळे त्यांचें वजन कांही कारणाने वाढल्यास ते खालीं लोंबतात. अर्थात् स्तनांची मूळची रचना ताठ उभ्या राहणाऱ्या शरीराला योग्य नव्हती,

आाण तांत अजून फरक झालेला नाही, आणि यामुळेच स्तनांना कांहीतरी कृत्रि आधार देणें इष्ट असतें.

स्तनांचा आकार कसा असावा हें सांगणें कठिण आहे, कारण हा देश प्रमाणेंच नव्हे तर व्यक्तीव्यक्तींतही वेगवेगळा असतो. तथापि तो बहुध नारिंगासारखा किंवा पेरूसारखा असतो. टोंकाभोंवतीं कांही भाग इतर त्वचे पेक्षा काळसर असतो. गोऱ्या लोकांत हा भाग सामान्यतः गुलाबी असतें आणि इतरांत त्वचेच्या रंगाच्या मानाने तपकिरी किंवा काळा असतो.

अकरा-बारा वर्षे वयापर्यंत मुलांच्या व मुलींच्या स्तनांत फरक दिसत नाही, पण वयांत येण्याच्या सुमाराला मुलीचे स्तन वाढतात, आणि १८ ते २० वर्षें वयांत स्तनांना संपूर्णता येते. ज्यांना मुलें झालीं नाहीत, किंवा ज्यांनी मुलें फारशीं पाजलीं नाहीत, अशा स्त्रियांच्या स्तनांचा आकार ४० वयाच्या पुढे देखील कायम राहतो. परंतु सामान्यतः इतरांचा रहात नाही आणि स्तन जागा-वर न राहतां लोंबू लागतात.

सौंदर्याच्या दृष्टीने स्तनांचें आडवें माप ४ ते ५ इंच, उभें माप ३ ते ४ इंच, आणि छातीपासून टोंकाची उंची दोन ते अडीच इंच असावी असें मानतात. छातीवर स्तनांची जागा कोणती असावी, यासंबंधी चित्रकार व शरीरशास्त्रज्ञ यांनी पुढील प्रमाण बसवलें आहे. मानेचा खळगा आणि स्तनांचीं टोंकें यांचा एक त्रिकोण आणि स्तनांचीं टोंकें व बेंबी यांचा दुसरा त्रिकोण मानल्यास यांतील वरच्या त्रिकोणाच्या तिन्ही बाजू सारख्या लांबीच्या असाव्या, आणि खालच्या त्रिकोणाच्या राहिलेल्या दोन बाजू सवापट लांबीच्या असाव्या. तसेंच स्तन तिसऱ्या व सहाव्या किंवा सातव्या फांसळ्यांच्या मधें असतो. त्याचें टोंक ४ थ्या व पांचव्या फांसळ्यांच्या मधें येतें, आणि दोन टोंकें जोडणारी रेषा काढल्यास ती ९ व्या आणि १० व्या मणक्यांच्या मधें येते. स्तन योग्य जागीं असल्यासच हीं मापें लागू पडतात आणि तींही सरासरी मानाने दिलेलीं आहेत.

स्तनांचें सौंदर्य राखावें कसें हें पुढील अंकांत पाहूं.

# ढुंगणाचा आकार कमी कसा करावा ?

( फ्रेंचवरून )

या उद्देशानें पुढे दिलेले व्यायाम विशेषतः स्त्रियांकरतां आहेत, कारण त्यांनाच त्यांची जास्त जरूर असते. या भागांतील मेद कमी होणें दुरापास्त असतें, आणि इतर सर्व शरीर बारीक झालें तरी येथे मेद शिल्लक राहतो. याचें कारण असें की विशिष्ट प्रकारचे व्यायाम केल्याशिवाय या भागाची हालचाल विशेष होत नाहीं आणि हालचाल झाल्याशिवाय मेद झडत नाही. अर्थात् कधींकधी येथील हाडांचाच आकार फाजील वाढलेला असतो आणि असें असेल तर त्याला इलाज नसतो. शिवाय प्रसूतीनंतर ढुंगणाचा आकार थोडाबहुत वाढणें अपरिहार्य असतें. याशिवाय इतर कारणांनी आकार वाढला असेल तर ती मेदवृद्धिच समजली पाहिजे, आणि तीवर इलाज करतां येतो. याकरतां पुढें दिलेले व्यायाम जलद केले पाहिजेत आणि नंतर लोकरीचें पांघरूण घेऊन बसावें म्हणजे चांगला घाम येऊन व्यायामाचा परिणाम जास्त होईल. पुढील व्यायामांशिवाय आणखीही कांही गोष्टींचा उपयोग होतो, उदा. पाय चांगला ताणावा लागेल इतकी बैठक उंच करून सायकलवर बसणें, होडी वल्हवणें, पोहणें, इत्यादींची शरीरसौंदर्य आणि प्रकृति उत्तम राखण्यास अतिशय मदत होते. तसेंच मर्दनाचा व अल्ट्राव्हायोलेट किरणांचाही उपयोग होतो, परंतु हीं तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करावीं लागतात.

**व्यायाम १.** एका कुशीवर सरळ निजून वरचा पाय वर ताठ उचलावा, आणि जास्त ताण पडावा म्हणून पाय उचलीत असतांना तोच पाय हाताने खाली दाबीत असावें. पाय वर उचलतांना श्वास बाहेर सोडावा, आणि तो सावकाश खाली आणतांना आंत घ्यावा. असें प्रत्येक कुशीवर दहा वेळां करावें.

२. ( मांडी ताणण्याकरतां ) गुडघे टेकून खाली बसावें. गुडघे जोडलेले असावे आणि पाय फांकलेले असावे. हात कमरेवर ठेवावे व पाय हाल्ल

दिल्याशिवाय बाकीचें शरीर मागें पाडून जमिनीला लावावें. तेवढेंच पुन: वर उचलावें आणि पुनः खाली न्यावें.

३. उजवा गुडघा टेकून त्यावर शरीर तोलून धरावें, व कमरेवर हात ठेवून डावा पाय डाव्या बाजूला लांब करून शक्य तितका वर उचलावा. तसेंच डाव्या गुडघ्यावर. असें प्रत्येक बाजूला वीस वेळां. प्रथम न साधल्यास एखाद्या खुर्चीचा किंवा टेबलाचा आश्रय घ्यावा.

४. एका गुडघ्यावर दोन्ही हात व कपाळ टेंकून दुसरा पाय शक्य तितका मागें न्यावा. नंतर जाग्यावरच उडी मारून मागचा पाय पुढे आणून पुढचा मागें न्यावा. पायांना शक्य तितका ताण देऊन असें १२ वेळां करावें.

५. गुडघे टेंकून हात मानेचे मागें न्यावे. हात तसेच ठेवून, दोन्ही पायांच्या उजव्या बाजूला ढुंगण जमिनीवर टेकावें. हात तसेच ठेवून पुनः मूळपदावर येऊन नंतर डाव्या बाजूला ढुंगण टेंकावें. असें वीस वेळां करावें.

६. कमरेवर हात देऊन पाय फांकून उभें रहावें. नंतर एक पाय तसाच ताणलेला ठेवून दुसरा गुडघा शक्य तितका वांकवून पायाची होईल तितकी घडी करावी. नंतर वर उठून पाय हालूं न देतां तसेंच दुसऱ्या बाजूला करावें. १५ ते २० वेळां.

---

# पत्रव्यवहार

## १.

जानेवारी १९३९ च्या खास अंकांत ' पत्रव्यवहार ' या सदराखाली पान २४९ वर तुम्ही कांही विधानें केलीं आहेत, त्यांसंबंधी खुलासेवजा हें पत्र लिहीत आहें. ' हिंदु विवाहाचा कायदा केवळ धर्म व रूढि यांवर आधारलेला आहे, तेव्हा या प्रश्नावर शंकराचार्यांचें मत आधार समजतां येईल ' हें विधान बरोबर नाही. हिंदु कायद्यांतील रूढि निर्णीत ठरावांनी ( ज्युडिशिअल् डिसिजन्स् )

निश्चित झाल्या आहेत. शंकराचार्यांनी जरी विवक्षित विवाह अशास्त्रीय म्हणून बेकायदेशीर आहे असें सांगितलें, तरी प्रचलित कायदा तसें मानणार नाही. उदाहरणार्थ देशस्थ, कोंकणस्थ वगैरे पोटजातींतील परस्पर विवाह शंकराचार्य अशास्त्र मानतात, कायदा मानीत नाही. त्याचप्रमाणे विविक्षित भिन्नगोत्रीय वधूवरांचे विवाह होत नाहीत असें शंकराचार्य सांगतील, परंतु हल्लींचा हिंदु कायदा असे विवाह कायदेशीर समजेल. विवाहाचे बाबतींत प्रचलित कायद्याच्या दृष्टीने मुख्य व आवश्यक निर्बंध म्हणजे वधूवरें सजातीय, असमान गोत्र व प्रवर असणारीं, व आईबापांपासून अनुक्रमें सात व पांच पिढ्यांपर्यंत सापिंड्य संबंध नसलेलीं असावीं. याव्यतिरिक्त कायदा कोणताही निर्बंध मानीत नाही. मग शंकराचार्य कांहीही म्हणोत. धर्मशास्त्राविरुद्ध व शंकराचार्यांच्या मतास न जुमानतां चातुर्मासांत जरी विवाह झाले तरी कायदा ते विवाह योग्यच मानील.

त्याचप्रमाणे 'राजिस्टर व धार्मिक अशा दोन्ही पद्धतींनी विवाह झाल्यास दोन्ही कायद्यांचीं बंधनें राहतात' असें एक विधान त्याच पानावर तुम्ही केलें आहे, तेंही बरोबर नाही असें वाटतें. रजिस्टर पद्धति किंवा 'विशिष्ट विवाहाचा कायदा' हा मुद्दाम केलेला कायदा ( स्टॅटयूटरी लॉ ) आहे व वैदिक विवाहपद्धति ही वैयक्तिक कायद्याची बाब आहे ( पर्सनल् लॉ ). त्यामुळें दोन पद्धतींमध्यें वैदिक विवाहपद्धतीला गौणत्व येणार. दोन्ही पद्धतींनी झालेला विवाह हा 'विशिष्ट विवाह' उर्फ रजिस्टर पद्धतीने झालेला विवाह म्हणूनच मानला जाईल. तोच विवाह पुनः वैदिक उर्फ धार्मिक पद्धतीने केला, तर त्या विवाहाचीं बंधनें मुळीच लागणार नाहीत, तो एक केवळ फार्स होईल. यासंबंधी विस्तृत विवेचन मी आपल्या 'विशिष्ट विवाहाचा कायदा' ( स्पेशल् मॅरेज् ॲक्ट ) या पुस्तकाच्या पान १३ व १४ मध्यें केलें आहे. जिज्ञासूंनी तें पहावें...केशव बाळाचार्य गजेंद्रगडकर, वकील, सातारा.

उ. शंकराचार्यांचें मत घ्यावें असें लिहिण्यांत आमचा उद्देश इतकाच होता की कांही विशिष्ट जातींत सापिंड्य असतांही कांही विशिष्ट नात्याच्या वधू-

वरांत विवाहाची रूढि आहे आणि असे विवाह कायद्यासही मान्य होतात. त्याचप्रमाणे शंकराचार्यांनी अनुकूल मत दिल्यास ते मान्य समजले जातील. तें प्रतिकूल असल्यास ते बेकायदा होतील, असें म्हणण्याचा उद्देश नव्हता. दुसऱ्या बाबतींत आम्ही जें मत दिलें होतें, तें केवळ आमचेंच मत नसून हल्ली हायकोर्ट जज्ज असलेले व पूर्वी सरकारचे लीगल 'रिमेंब्रन्सर' असलेले मि. के. सी. सेन आय्. सी. एस्. यांचें मत आम्ही त्या बाबतींत विचारलें होतें, व त्या आधारावरच तें लिहिलें होतें. तेव्हा हा प्रश्न कोर्टांत गेल्यास आपण म्हणतां तसाच निकाल होईल की काय, याबद्दल शंका वाटते. अर्थात् कोर्टांत गेलें नाही तोंपर्यंत कांहीही चालतें, पण या प्रश्नाचा निकाल एखादा खटला हायकोर्टांत जाईल तेव्हाच होणार. **सं.**

२,

'घटस्फोट व संततिनियमन' या मथळ्याचें एक कातरण 'संपादक, रविकिरण' यांजकडून आलें आहे व त्यांत केलेल्या विधानांसंबंधी समाधानकारक खुलासा **पुरुषार्थकार** व **समाजस्वास्थ्यकार** यांनी करावा अशी अपेक्षा त्यांत दाखवली आहे. या दोन्ही बाबतींत आम्ही स्वतःचें मत अनेक वेळां सांगितलें आहे, त्याने कोणाचें समाधान होणें न होणें आमचेवर अवलंबून नाही. पतिपत्नींला कायद्यानें जखडून बांधून ठेवून कुटुंबसंस्थेला स्थैर्य येतें असें मानणें ही फसवणूक आहे. अशा स्थितींत पत्नीचें प्रेम म्हणजे आफिसांतल्या साहेबाशीं प्रयत्नाने राखलेल्या स्नेहासारखें आहे. कोणत्याही प्रकारचें बंधन नसतांना जर दोन माणसांचा स्नेह कायम राहिला तरच तो खरा स्नेह. जुलमाचा रामराम काय कामाचा?—माल्थस्ने प्रतिपादलेलें तत्व अजून कोणीही खोडून काढलेलें नाही, देशाची लोकसंख्या कांही मर्यादेनंतर वाढत नाही हें खरें, पण हें माल्थस्च्या विरुद्ध नाहीं. देशांतील अन्नाचा पुरवठा वाढत नाहीसा झाला की लोकसंख्याही वाढणें शक्य नाही असेंच माल्थस् म्हणतो. पण अशा वेळीं ती रोगराई, दुष्काळ वगैरे कारणांनी मर्यादित राहते, व या

गोष्टी आमचे मतें अनिष्ट आहेत. ज्यांना दुष्काळ व रोगराई पसंत असतील, त्यांनी संततिनियमनाला विरोध करावा. पण आम्ही त्यांना दुष्ट म्हणतों इतकेंच. **सं.**

---

# शारदेचें पत्र

——××——

मागसलेल्या सनातन्यांचें प्रतीक होऊं पाहणारें ' गोरक्षण ' आतां साप्ताहिक झालें आहे म्हणे. त्यांनी जानेवारीच्या एका अंकांत प्रोफेसरांवर तोंडसुख घेतलें आहे. लेखणीस येईल तें लिहिण्यापूर्वी त्यांनी मानसशास्त्राचा थोडा अभ्यास केला असता तर बरें झालें असतें, पण मग कदाचित् प्रोफेसरांना शिव्या देतांना ते थोडे कचरले असते आणि तें कदाचित् त्यांच्या दृष्टीने बरें झालें नसतें. मुलें प्रोफेसरांच्या हाताखालीं शिकायला जातात, तीं सुमारें सोळा वर्षांपुढें. मुलांचा स्वभाव फार लवकर बनतो आणि पुढे उपदेशाने त्यांत फारसा फरक करतां येत नाही ही साधी गोष्ट या विद्वानांना माहीत नाही. मुलांचा स्वभाव कसा बनेल, हें मुख्यतः आईबाप, आणि फारतर प्राथमिक शाळांतील शिक्षक, यांवर अवलंबून असतें. त्यांत प्रोफेसर कांही करूं शकत नाहीत. पण एवढा विचार करतो कोण ? गांधींनी ' हरिजन 'मधें लिहिलें की ' प्रोफेसर आणि शाळामास्तर यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगीं सभ्यता बिंबवणें हें नेमलेले विषय शिकवण्याइतकेंच त्यांचें कर्तव्य नव्हे काय ? अर्थात् गांधीजींना मानसशास्त्रज्ञाची परवाच नाही. जें त्यांच्या तोंडातून निघेल तेंच मानसशास्त्र ! कारण त्यांचा ' आंतला आवाज ' आहे ना ? आणि अशा सर्वज्ञ माणसाने कांही म्हटलें की परप्रत्ययनेय किंवा परमूर्खत्वनेय लोकांना तें वेदवाक्यच झालें. मग काय ? वाटेल त्यावर तोंडसुख घ्यायला मुभाच झाली. मुलींना त्रास देण्याची इच्छा कॉलेजांतल्या मुलांना कां होते, याचा यांनी कधी विचार केला आहे का ! अशा मुलांच्या डोक्यांत पुस्तकें मारल्याने हा प्रश्न सुटत नाही, आणि तो सोडवण्याचा

प्रयत्न गांधींनी मुळीच केलेला नाही. त्यांनी उलट मुलींचीच चेष्टा केली आहे. मुलें अशा रीतीने वागतात आणि गांधी आपल्या भोंवतीं बायका गोळा करतात, या दोहोंच्या मुळाशीं एकच तत्व आहे. **गोरक्षणां**तले विद्वान लेखक लिहितात, 'आमच्या पुराणग्रंथांतील स्त्रीपावित्र्याची कल्पना तर उदात्त आहेच, पण ऐहिक सुखास लालचावलेल्या पाश्चात्य देशांतहि स्त्रीदाक्षिण्य ही एक मोलाची चीज समजली जाते, हें तरी आमच्या तरुणांनी विसरूं नये.' म्हणजे तेवढ्यांत स्वतःची घमेंड मारून दुसऱ्याला शिव्या देण्याची संधि त्यांनी साधलीच आहे, पण त्यांतच स्वतःचें अज्ञानही दाखवलें आहे. यूरोपांतील स्त्रीदाक्षिण्य देखील वरकरणीच असतें, आणि जो कांही खरा फरक दोहोंत दिसत असेल, त्याचें कारण परिस्थितींतील फरक हें आहे, येथील तरुण तेथील तरुणांपेक्षा दुष्ट असतात हें नव्हे. कोणत्याही समाजांत ज्या मानानें स्त्रियांना पडदा पाळावा लागेल, त्या मानानें तेथील पुरुषांत स्त्रियांविषयीं कुतूहल वाढतें आणि त्याचें समाधान होण्याचें साधन नसलें म्हणजे ते कमीअधिक प्रमाणांत अत्याचार करायला प्रवृत्त होतात. यूरोपांत मुलांना मुलींशीं ओळख होण्याची संधि पुष्कळच अधिक प्रमाणांत मिळते, म्हणून तेथील तरुण अधिक सभ्यतेनें वागतात. येथे जो सहशिक्षणाचा फार्स चालू आहे, त्यामुळे ओळख तर होत नाहीच, पण कुतूहल मात्र अधिक वाढतें. वर्गांत वेगळीं बांकें, बसायला वेगळी खोली, खेळाचे वेळीं तीच स्थिति, याला काय सहशिक्षण म्हणायचें ? त्यापेक्षा तें नसलेलें काय वाईट ? गांधींना आणि गोरक्षणवाल्यांनाही हें कळलें पाहिजे की या गोष्टी परिस्थितीवर अवलंबतात, स्वाभाविक दुष्टपणावर नव्हे, आणि प्रोफेसरांवर तर नव्हेच नव्हे. तेव्हा प्रोफेसरांना शिव्या देऊन काय होणार ? याला अपवाद म्हणून त्यांनी दहापांच सनातनी प्रोफेसरांची पाठही थोपटली आहे, पण सनातनीपणा हें प्रोफेसरांचें कर्तव्य नव्हे, मुलांना गतवैभवाच्या गप्पा सांगण्यापेक्षा अधिक प्रगतिशील मार्ग त्यांनी स्वीकारला पाहिजे. आमचे पूर्वज मोठे होते, आमचा धर्म सर्वांत मोठा, आम्ही मूर्ख असलों तरी आमचे पूर्वज शहाणे होते की नाही ? असल्या वल्गना

करायला **गोरक्षण**कार आहेतच, त्याला प्रोफेसरच काय करायचे ? प्रोफेसरांनी पुरोगामी दृष्टि राखली पाहिजे, तरच कांहीं होईल. गतवैभवाकडे पाहून कोणताही फायदा होणार नाहीं,

येथल्या हेमंतव्याख्यानमालेंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि प्रो. वा. म. जोशी या दोन व्याख्यात्यांनीं ' आम्ही हिंदु आध्यात्मिक आहोंत ' या गोरक्षणी कल्पनेला विरोध केला. ही कल्पना जुनीच आहे, आणि जावडेकरांनीं ' आधुनिक भारत ' या ग्रंथांत तीवर जोर दिला आहे. घमेंड मारण्यासारखें आपल्याजवळ कांहींतरी आहे, असें वाटल्याशिवाय मनुष्याला बरें वाटत नाही. हल्लींचें हिंदुस्थान सर्व दृष्टींनी मागसलेलें आहे, हें डोळे उघडे ठेवणारांना सहज दिसण्यासारखें आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानने कसली घमेंड मारावी ? कुस्तींत चीत झालेल्या मनुष्याने माझेंच नाक वर म्हणून घमेंड मारावी, त्याप्रमाणें भौतिक वैभव आपल्याला नाही असें पाहून, ' असल्या ऐश्वर्याची आम्हाला काय परवा ? आमचें आध्यात्मिक वैभव आम्हाला आहेच, आणि आम्हीच त्याचे धडे सर्व जगाला देऊं. ' अशी घमेंड हिंदी लोक मारतात. शिवाय वेळ पडेल तेव्हा ' आमच्या पूर्वजांनी भौतिक वैभव मिळवलें होतें ' अशीही घमेंड आम्ही मारतों. पण घमेंडीपेक्षा यांत कांही नाही, अध्यात्म हा केवळ कल्पनेचा खेळ आहे, आणि त्याचा मक्ता हिंदुस्थानला दिलेला नाही. अशा गप्पा सर्व देशांतील धार्मिक लोक मारीत असतात, हें वरवर पाहणारालाही दिसण्यासारखें आहे. पण असें म्हटलें तर मग आम्ही घमेंड कसली मारावी ? तेव्हा तें कबूलच न करतां अध्यात्माचा मक्ता आमच्याकडेच आहे असें म्हणणें बरें, कारण घमेंड ही जीवनाला अवश्य आहे. पण ही मोहनिद्रा भंग पावल्याशिवाय हिंदुस्थानची कोणत्याही दृष्टीने प्रगति होणें शक्य नाही. वामनरावांनी पाश्चात्यांची जी भरमसाट स्तुति केली, तींत मला कांही मोठासा अर्थ दिसत नाही. त्यांच्याप्रमाणे आमच्यांतही सत्यनिष्ठ आणि ध्येयनिष्ठ लोक असतात, पण असे लोक कोठेही थोडेच असायचे.

वामनराव म्हणतात, ज्ञानाची लालसा, सत्याची आवड, मतप्रदर्शनाबद्दल आस्था व आचरण, वगैरे गुणांनी ते वैभवास चढले. मला वाटतें पाश्चात्यांचें आजचें वैभव हा एक ऐतिहासिक अपघात आहे. असें वैभव हिंदुस्थानलाही एका काळीं होतें, आणि त्यावेळीं हिंदूंचीही अशीच स्तुति इतरांनी केली असेल. इंग्लंदच्या वैभवाला क्लाइव्हची असत्यनिष्ठा बऱ्याच अंशीं कारण झाली आहे. चोरी, लुच्चेगिरी, खून म्हणजे राजकारणांतल्या अगदी नेहमीच्या गोष्टी, आणि असल्या युक्त्यांनींच इंग्लंदने वैभव मिळवलें. जो जास्त बिलंदर तो यशस्वी व्हायचा, हें जणूं काय ठरलेलेंच. शास्त्रीय ज्ञानांत पाश्चात्यांनी जी प्रगति केली आहे, त्याला देखील या वैभवाचीच मदत झाली आहे, कारण हल्लीचे शास्त्रीय शोध पैशाशिवाय होत नाहीत. पुस्तकें विकत घ्यायला देखील पैसे लागतात, तेव्हा गरीब राष्ट्रांतले लोक पुढे येणें बरेंच मुष्किलीचें असतें. हिंदुस्थान गरीब आहे, परचक्राखाली आहे, आणि जित राष्ट्रांचे दुर्गुण साहजिकच हिंदी लोकांत आले आहेत. अशा वेळीं जोराचा प्रयत्न केल्यासच कांही होईल. आम्ही आध्यात्मिक, म्हणून समाधान मानणें हा अधोगतीचा मार्ग आहे.

न. चिं. केळकरांना हल्ली गांधींसारखेंच वेड लागलें आहे की काय, अशी मला दाट शंका येते. परवां त्यांनीं येथे हेमंतव्याख्यानमालेंत सांगितलें की ईश्वराने सर्व मनुष्यांना बुद्धि सारखीच दिली आहे, फक्त संधि आणि ज्ञान सारखें दिलें नाही. यांतला ईश्वर बाजूला ठेवला तरी सर्वांना बुद्धि सारखी नसते ही कोणत्याही शाळामास्तरला कळणारी गोष्ट केळकरांना कशी कळत नाहीं ? असलीं गांधीछाप विधानें करणाराला वेड लागलें नाहींतर काय म्हणायचें ? कदाचित् टिळकांइतकीच बुद्धि आपल्याला आहे असें स्वतःला भासवण्याचा तर हा मार्ग नसेल ? न्यूनगंडाचा हा एक प्रकार दिसतो.

तुझी शारदा

——:०:——